भंडारा व गोंदिया या २ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत १५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका- प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य

क्रमांक:-रानिआ/जिपपस/२०२१/प्र.क्र.०२/का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २६ नोव्हेंबर,२०२१.

प्रति,
जिल्हाधिकारी,
भंडारा, गोंदिया

विषय :- भंडारा व गोंदिया या २ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत १५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका- प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम

संदर्भ :- १) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०१७/प्र.क्र.२/का.०७, दि. ०२ /०१/२०१७ चे आदेश.
२) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०२१/प्र.क्र.०२/का.०७, दि. ०९/११/२०२१ चे पत्र.

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त संदर्भांकित अ.क्र.२, दि.०९/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये भंडारा व गोंदिया जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणाऱ्या १५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम देण्यात आला असून दि.२४/११/२०२१ रोजी अंतिम मतदार यादी व दि.२६/११/२०२१ रोजी मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे.

२. आता या पत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ट-२ मध्ये नमूद करण्यात आलेल्या भंडारा व गोंदिया जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणाऱ्या १५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी परिशिष्ट-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे.

३. भंडारा व गोंदिया जिल्हा परिषद व त्याअंतर्गत १५ पंचायत समित्यांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यापासून निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत उक्त जिल्हा परिषद व पंचायत समिती क्षेत्रात आचारसंहिता लागू राहील. भंडारा व गोंदिया जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांमधील

मतदारांवर प्रभाव पडेल, अशा तऱ्हेचे कोणतेही धोरणात्मक निर्णय, कोणतीही कृती/घोषणा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था, खासदार, आमदार किंवा इतर कोणत्याही पदाधिकाऱ्यांना करता येणार नाही.

४. उपरोक्त जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमधील नागरिकांचा मागास प्रवर्गाचे आरक्षण हे महाराष्ट्र अध्यादेश सन २०२१ चा ३ नुसार निश्चित करण्यात आले आहे. तथापि, मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठात दाखल रिट याचिका क्र.११७४४/२०२१ द्वारे राज्य शासनाच्या सदर दि.२३/०९/२०२१ रोजी पारित केलेला महाराष्ट्र अध्यादेश क्र.३/२०२१ ला आव्हान देण्यात आले असून दि.२२/१०/२०२१ रोजीच्या अंतरीम आदेशानुसार सदर याचिका प्रलंबित असताना आयोगातर्फे करण्यात आलेली कोणतीही कार्यवाही या याचिकेच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहील.

५. तसेच भंडारा व गोंदिया जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणाऱ्या १५ पंचायत समित्यांमधील निवडणूकीसंदर्भात कोणत्याही न्यायालय याचिका दाखल असल्यास त्याबाबत खातरजमा करुन न्यायालयाच्या आदेशानुसार आवश्यक कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

६. माहे फेब्रुवारी,२०१७ मध्ये घेण्यात आलेल्या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्यावेळी निवडणुकीच्या पुर्वतयारीबाबत राज्य निवडणूक आयोगाने संदर्भांकित दि. २ जानेवारी,२०१७ च्या पत्रान्वये सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत. तरी सदर सूचनांनुसार भंडारा व गोंदिया जिल्हा व त्याअंतर्गत येणाऱ्या १५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीमध्ये कार्यवाही केली जाईल याची दक्षता घेण्यात यावी.

७. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १२-अ नुसार राखीव जागेवर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने नामनिर्देशनपत्र पत्रासोबत जातप्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

८. सदर निवडणूक कार्यक्रम राबविताना कोविड-१९ या साथी रोगाच्या अनुषंगाने घ्यावयाची खबरदारी म्हणून पुढील नमूद प्रतिबंधात्मक उपाययोजना अवलंबवावी, जसे-

१. संबंधित निवडणूक क्षेत्रात शक्य असल्यास प्रभावीरित्या लसीकरण मोहीम राबवावी.
२. मतदान व मतमोजणी करीता अधिकारी / कर्मचारी यांची नेमणूक करताना त्यांचा किमान पहिला लसीकरणाचा डोस झालेला असावा व शक्यतो दोन्ही डोस झालेले असावेत, याची खात्री करण्यात यावी.

३. निवडणूक प्रचार सभा व रॅली यांच्याकरिता खुल्या प्रांगणामध्ये उपस्थितांची संख्या प्रांगणाच्या क्षमतेच्या ५०% परंतु जास्तीत जास्त २०० व्यक्तींच्या मर्यादेत असावी व बंदिस्त कार्यालयातील प्रचार सभांमध्ये उपस्थितांची संख्या क्षमतेच्या ५०% परंतु जास्तीत जास्त १०० व्यक्तींच्या मर्यादेत असावीत.

४. मतदानाच्यावेळी मतदान कर्मचारी तसेच मतदारांनी कोविड प्रतिबंधात्मक नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. केंद्र व राज्य शासनाने कोविड-१९ या साथीच्या रोगाचा प्रतिबंधात्मक उपाय म्हणून विविध उपाययोजना व दक्षता घेण्याबाबत वेळोवळी सूचना जाहीर केल्या आहेत. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका पार पाडताना कोविड-१९ च्या अनुषंगाने घ्यावयाच्या खबरदारीबाबत राज्य निवडणूक आयोगाकडून क्र. रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र.०१/का.८, दि. १५ डिसेंबर,२०२० तसेच दि. १३ जानेवारी, २०२१ च्या पत्रान्वये स्वतंत्रपणे मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. तरी सदर पोटनिवडणूका पार पाडताना उपरोक्त मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता घ्यावी.

९. सदरचा निवडणूक कार्यक्रम आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

आपला,

( किरण कुरुंदकर )
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सोबत-परिशिष्ट-१ व २

प्रत :-

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
४. अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम इमारत, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई.
५. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. विभागीय आयुक्त, नागपूर
८. जिल्हा पोलिस अधिक्षक, भंडारा व गोंदिया
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा व गोंदिया
१०. संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नीरोड, मुंबई-४
११. महिती जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
१२. राज्य निवडणूक आयोगाचे मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर येथील वकील
१३. संगणकीकरण कक्ष, राज्य निवडणूक आयोग यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१४. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
१५. निवड नस्ती (कार्यासन-७), राज्य निवडणूक आयोग

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-
रानिआ/जिपपंस/२०२१/प्र.क्र.०२/का.७,
दिनांक २६/११/२०२१ सोबतचे सहपत्र

परिशिष्ट-१

## भंडारा व गोंदिया व त्याअंतर्गत १५ पंचायत समित्यांमधील सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम

| क्र. | कार्यक्रमाचा तपशिल | कार्यक्रमांचा दिनांक |
|---|---|---|
| १ | निवडणुकीच्या तारखांची सूचना व निवडणुकीचा कार्यक्रम जिल्हाधिकाऱ्यांनी प्रसिध्द करण्याची तारीख | बुधवार, ०१ डिसेंबर,२०२१ |
| २ | संकेतस्थळावर भरण्यात आलेले नामनिर्देशनपत्र निर्वाचन अधिकाऱ्यांनी स्विकारण्याचा कालावधी | बुधवार, ०१ डिसेंबर,२०२१ (सकाळी ११ ते दु.३ पर्यंत) ते सोमवार, ०६ डिसेंबर,२०२१ (सकाळी ११ ते दु.३ पर्यंत) (रविवार दि.०५/१२/२०२१ रोजी नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाहीत.) |
| ३ | नामनिर्देशनपत्राची छाननी व त्यावर निर्णय देणे | मंगळवार, ०७ डिसेंबर, २०२१ (सकाळी ११ वाजल्यापासून) |
| ४ | वैध उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | मंगळवार, ०७ डिसेंबर, २०२१ ( छाननीनंतर लगेचच ) |
| ५ | नामनिर्देशनपत्राचा स्विकार करण्याबाबत किंवा ते नामंजूर करण्याबाबतचा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयाविरुध्द जिल्हा न्यायाधिशांकडे अपिल करण्याची शेवटची तारीख | शुक्रवार, १० डिसेंबर,२०२१ |
| ६ | जिल्हा न्यायाधिशांनी अपिलावर सुनावणी व निकाल देण्याची संभाव्य शेवटची तारीख | सोमवार, १३ डिसेंबर,२०२१ |
| ७ | जिल्हा न्यायाधिशांनी अपिल निकालात काढल्यावर वैध उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | सोमवार, १३ डिसेंबर,२०२१ |
| ८ | उमेदवारी मागे घेणे (अ) जेथे अपील नाही तेथे | सोमवार, १३ डिसेंबर,२०२१ (सकाळी ११ ते दु.३. पर्यंत) |
| | (ब) जेथे अपील आहे तेथे | बुधवार, १५ डिसेंबर, २०२१ (सकाळी ११ ते दु.३ पर्यंत) |
| ९ | निवडणूका लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे व निशाणी वाटप- (अ जेथे अपील नाही तेथे | सोमवार, १३ डिसेंबर,२०२१ ( दुपारी ३.३० नंतर) |
| | (ब) जेथे अपिल आहे तेथे | बुधवार, १५ डिसेंबर,२०२१ ( दुपारी ३.३० नंतर) |

| | | |
|---|---|---|
| १० | मतदानाची तारीख | मंगळवार २१ डिसेंबर,२०२१ (सकाळी ७.३० ते ५.३० पर्यंत) |
| ११ | मतमोजणी तारीख | बुधवार २२ डिसेंबर,२०२१ (सकाळी १०.०० पासून) |
| १२ | निवडून आलेल्या सदस्यांची नावे प्रसिध्द करणे | मंगळवार, २८ डिसेंबर,२०२१ पर्यंत |

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०२१/प्र.क्र.०२/का.७, दि.२६/११/२०२१

## परिशिष्ट-२

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नांव | पंचायत समितीचे नाव |
|---|---|---|
| १ | भंडारा | १) तुमसर |
| | | २) मोहाडी |
| | | ३) भंडारा |
| | | ४) साकोली |
| | | ५) लाखनी |
| | | ६) पवनी |
| | | ७) लाखांदूर |
| २ | गोंदिया | १) गोंदिया |
| | | २) तिरोडा |
| | | ३) गोरेगाव |
| | | ४) आमगाव |
| | | ५) सालेकसा |
| | | ६) सडकअर्जुनी |
| | | ७) अर्जुनी मोरगाव |
| | | ८) देवरी |